# ''एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी मराठी साहित्य''

**प्रा. संध्या उदयभान शंडे**
*एस. चंद्रा महिल महाविद्यालय साकोली*
*जि. भंडारा.*

आधुनिक ''स्त्रीवाद'' ही कल्पनाच मुळात पाश्चात्य विचाराधारा आहे. नव्या जाणिव घेऊन उदयाला आलेले साहित्य नवे घाट घेऊन अवतरते स्त्रीवादी विचारप्रणाली पाश्चात्य असली तरी स्त्रियांच्या संदर्भात भारतीय स्त्रीया विचार करताना एकविसाव्या भातकातील ''स्त्री'' धार्मिक, आर्थिक साामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि मानसिक हत्या कुंचबनल्या जातात. तिची अस्मिता एकविसाव्या शतकातही कमी होत आहे. एकविसाव्या शतकात ही स्त्रीची सांस्कृतिक दडपशाही सुरू साहित्य नेमक काय? याचा विचार करणे महत्वाचे साहित्याचे वर्गीकरण लघुकथा, कादंबरी, कविता (भाव) माहाकाव्य, खंडकाव्य, नाटक, शोकालिना, सुखात्मिका, प्रहसन अशा अनेक प्रकारांमध्ये स्त्रीवादी साहित्याचे वर्गीकरण केले जाते. मराठी साहित्यात साधारणता 1960 नंतर स्त्रीवादी साहित्य जाणीव पूर्वक लिहिले जाऊ लागले. आणि 60–81 च्या व नंतरच्या दशकांतही स्त्रीवादी विकसित होऊ लागला.

महाराष्ट्रात महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, इत्यादीनी तसेच नंतर ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, समाज व्यवस्थेचे, तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम शोषन व त्यातूंन स्त्रियांना भोगावीलागणारी दुःखे, वेदना, यांचे प्रभावी चित्रण केले. 20 व्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, गौरी देशपांडे, भाांता गोखले इ. इत्यादी लेखिकांनी स्त्रीवादी साहित्यात भर टाकली.

एकविसव्या शतकातील स्त्रीवादी मराठी साहित्या ची जाणीव म्हणायचे, जगभर प्रदीर्धकाळची वितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे. त्या व्यवस्थेने जैविक लिगंभेदाला, सांस्कृतिक लिगंभेदाचे रूप दिले. यात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे, कार्यक्षेत्र, कर्तव्ये, या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादली. या गोष्टीची जाणीव म्हणजे स्त्रीवादी साहित्याची जाणीव होय.

स्त्रीयांच्या साहित्यातील प्रथात्य वेगळेपण भोधून त्यांची चिकित्या करण्याचे कार्य काही वर्षात स्त्रीवादी समीश्रकांनी केले आहे. स्त्रीयांचा अस्तित्वाचे भोध आणि बोध होत असून तिला आपल्या अस्मितेचे भान लेखनातून आले. एकविसाव्या भातकात स्त्री आपल्या समाजामध्ये कसे आत्मविश्वास आणि आत्मसन्मानाने जागृत झाल्या आणि एक व्यक्ती म्हणून समाजात आपले स्थान प्राप्त करण्यासाठी साहित्यातून प्रयत्न करू लागली आहे. एकविसाव्या भातकात तिच्या मानसिकतेत बदल होत आहे. हाबदल समजून घेण्यासाठी आज लिहिणाऱ्या व स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळाखल्या जाणाऱ्या स्त्रियांचा कथा, कादंबऱ्या, कविता इत्यादी साहित्यांतून त्यांच्या 'स्व' त्याचा शोध त्यांनी कसा घेतला आहे, त्याची जाणीव त्यांना कशा प्रकारे झाली आहे. त्याचे स्वरूप व नेमकेपणा यांचे विवेचन–विश्लेषण स्त्रीवादी साहित्यात केले जाते. स्वत्वाचा भाोध घेऊ जाहणारे, स्वत्वाचा जाणिवेने केलेले आत्मप्रकारीकरण व आत्मशोध स्त्रीवादी साहित्या च्या वेगवेगळया दिशा एकविसाव्या दशकात जागतात.

**स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्टे :–**

स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांच्या लेख परंपरिचा इतिहास सिध्द करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांतून एक 'स्त्री केंद्री' साहित्य प्रवाह निर्माण झाला. पाश्यात्य देशात स्त्री मुक्मी चळवळ वेगाने फोफावली व तिचाच एक भाग असलेली स्त्रीवाद म्हणजेच 'मॅडकमन' म्हणजे वद्रोह करणारी, उद्वेगाने सर्व उद्ध्वस्त करायला निघालेली स्त्री. स्त्रीची विशिष्ट अशी संस्कृती असते. स्त्रियांच्या लेखनातून– त्यांच्या आगळया वेगळया पृथगाल अनुभव चित्रणातून त्यांचे अश्या विषय, वाङ्ःयीन रूपबंध, अविष्कार–रीती भौली, भाषा इ. वाङ्ःयीन घटकांतून ही स्त्री –संस्कृती वेगवेगळया रूपांतप्रकरन असते. स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्टे प्रामुख्याने त्याच्या लेखनात आढळतात. स्त्रियांच्या लेखनाचा जीवशास्त्रीय भाषिक, मानवशास्त्रीय, सांस्कृतिक अशा वेगवेगळया दृष्टिकोणातून वेध घेऊन त्यातील वेगळेपण अधोरेखित करणे वैशिष्ट ठरते. तसेच स्त्रीचे स्व चा शोध घेऊ पाहणारे, स्वत्वाच्या जाणिवेने केलेले आल प्रकारीकरण व आत्मशोध हया स्त्रीवादी साहित्याच्या वेगवेगळया दिशा आहेत. हया भिन्न भिन्न जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्याचे वेशिष्टे आहेत. त्याच प्रमाणे त्याचे धारदार व प्रखर लेखन अधिक नेमके होते.

स्त्रीवाद ही एक समाज परिवर्तन घडवू पाहणारी जाणिव आहे. या स्त्रीवादी जाविवेचा विविध दृष्टिकोणातून, भिन्न भिन्न पातळयावरचे लेखन आविष्कार स्त्रीवादी साहित्यात आढळून येतो. स्त्रियांचे, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा भाोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्टे होय. स्त्रीवादी साहित्याचे वेशिष्टे केवळ स्त्रिनिर्मित साहित्य नव्हे, तर पुरूष केंद्री विचार व्यूहातन मुक्त अशा परिप्रेश्रयातून वेगळी जाणिव म्हणता येईल.

**स्त्री स्वकथन :–**

स्त्रीयाचे स्वकथन हा सामाजिक जाणीव आणि उपेश्रित समाजाचे वास्मव असलेला दस्ताऐवज आहे, सामाजिक वास्तवांना शब्दबद्द करून वाचकांना सामाजिक जीवनाचे दर्शन घडविण्याचे कार्य स्वकथनांमधून झाले आहे.

स्यियांनी देखील स्वकथन या वाङ्मय प्रकारात स्वकथने लिहून मेलाची भर टाकली आहे. एकाविसाव्या शतकातील स्त्री स्वकथन मध्ये (तीन दगडाची चुल 2000), ऊर्मिला पवार (आयदान 2003), सुशीला पटेकर (फरफट 2004) कौसल्या बैसंत्री (दोहरा अभिशाप – हिंदी), यशोधरा

गायकवाड (माझी मी 2006), विभा राही (विषकन्या 2009) इत्यादी लेखिकानी स्वकथने लिहून स्त्रीवादी सहित्यान अधिक समृध्द केले आहे. नागपूरच्या पाली भाषेच्या प्राध्यापिका डॉ. मालनी बोदेले–साखरे यांचे 'झुंझरूक' (2009) हे चरित्रात्मक पुस्तक आहे. ग्रामीण जीवनाचा तप ीलवार आलेख या पुस्तकात देण्यात आलेले आहे.

**वैचारिक आणि संशोधनात्मक लेख :**

स्त्रियाचे एक विशिष्ठ तत्वज्ञान आहे. या तत्वाज्ञानाच्या आधारावर एक स्वतंत्र विचारसरणी विकसित झाली आहे. ती म्हणजेच वैचारिक आणि संशोधनात्मक स्त्रीवादी विचारातून आलेले लेख आहे. प्रस्थापित पुरूषवादी विचारातून बाहेर 'स्व' ची जाणीव त्याच्या लेखनातून आलेली आहे. डॉ. सरोज आगलावे (जोतीराव फुले यांचे सामाजिक विचार, 2000) तसेच (जोतीराव फुले का सामाजिक दर्शन (हिंदी) 2005) 'डॉ. सुशील मूल–जाधव', (भगवान बुध्द डॉ. आंबेडकर आणि भारतीय स्त्री 006) डॉ. मालती बोदेले–साखरे तर डॉ. ज्योती लांजेवार ('दलित कादंबरीतील स्त्री चित्रण',– 2008) 'भारतीय समाज आणि स्त्री–2005) डॉ. सविता मेंढे कांबळे (मदान अढकथा व आचार्य बुध्दत, 2008) इत्यादी लेखिकांनी वैचारिक आणि संशोधनात्मक लेखन केले आहे.

**स्त्रीवादी कविता :–** स्त्रीत्वाची जाणीव आपल्या अस्तित्वाची आणि आस्मितेची जाणीव स्त्री कवितेत झालेली आढळतात. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीयांचे एकविसाव्या शतकातील कविता आहे. उषाकिरण आत्राम हयाच्या ('एक झोका आनंदाचा' 2001), (लेखणीच्या तलवारी, 2009) हे काव्यसंग्रह आहेत. गोंडी भाषेतील (माटयारीन) काव्यसंग्रह आहेत. (लेखणीच्या तलवारी) संग्रहातील आधुनिक एकविसाव्या शतकातील कविता (आई! मारू नकोस गर्भात!) प्रसिध्द कविता आहे. तसेच सीमा साखरे (अलबम) कविता संग्रह प्रसिध्द आहेत. इंदिरा संत (निराकर, 2008) यांनी 'इंदिरा' या नावाने काव्य लेखन केले.

**हिंदी आणि इतर भाषांतील कविता :–**

अलिकडे हिंदी आणि इतर भाषेत देखील स्त्री कविता प्रकाशीत आहेत. एकविसाव्या भातकातील इतर भाषांतील कविता मध्ये डॉ. सुशीला टाकमौरे यांचे ('स्वाती बुंद और खारे मोती',) (हमार हिस्से का सूरज, 2005) (संघर्ष, 2006) इत्यादी लेखिकाचे स्त्री कविता प्रसिध्द आहेत. आदिवासी जीवनाचे वास्वतव दर्शन घडविणाऱ्या सौ. कुसुमताई अलाम याचे कविता संग्रह आहेत (रान आसवाचे मळे, रान पाखरांची माय, रान जख्मांचे गोंदण) प्रसिध्द आहेत.

स्त्री साहित्यातीक एक कवियत्रीचा उल्लेख महत्वपूर्ण आहेत.स्त्री संवेदन पर कविता करणारी कवियत्री म्हणून 'अनुराध पाटील' हयांच्या काव्यलेखानाचा निर्देश केला जातो. एकविसाव्या भातकातील त काव्यसंग्रह (बाळूच्या पात्रात मांडलेला खेळ, 2005) यात स्त्री जीवनातील दुःखंचा आत्म ोध आढळते.

**स्त्री साहित्यांतील नाटक**

स्त्री साहित्यातील नाटकाचे स्वरूप स्पष्ट करताना काही लेखीकाचे नाटक एकविसाव्या शतकातील उल्लेखनीय वाटतात. 'स्नेहल राटेक' (साऱ्या विश्वाला बुध्द हवा!, 2009) तसेच हिंदी भाषेतील (नंगा सत्य, 2006) प्रकाशित आहेत. तसेच ''सीमा साखरे (नंदादीपा ठेवत रहा) एकविसाव्या शतकातील नाटक महत्वपूर्ण आहेत.

काही स्त्री साहित्यातील पुस्तके एकविसाव्या भातकातील प्रसिध्द आहेत. अरूणा सबाने, (डॉ. आंबेडकर आणि स्त्री 2002) डॉ. मंजू सुमन (दलित महिलाऍं, 2004) 'कुसुम अलाम'(रान गर्भाची वेदना), दुर्गा भागवत (मर्मज्ञ अभ्यास), चिंतनशील व्यासंग 'भावनात्मकता', (उत्कट कल्पकता) इ. लेखविशेष पुस्तके प्रसिध्द आहेत. 'सीमा साखरे' यांचे ('भरारी', स्त्रीवादी चळवळीच्या प्रणेत्या ताराबाई शिंदे, 'स्त्रियाशी एक संवाद','स्त्रियांच्या न्यायाला प्रश्न') इ. लेखसंग्रह एकविसाव्या शतकातील प्रकाशित आहेत.

**स्त्रीवादी कादंबरी :–**

'अरूणा लोणंदकर'(वल्लरी, 2003), डॉ. करूणा जमदाडे (रमा आणि यशोधरा, 2006) अरूना सबाने (विमुक्ता, 2006) (मुन्नी 2010) या कांदबऱ्या महत्वाच्या आहेत. बिहारच्या 'कावेरी' (मीस रभीग्या) 'महूआ माझी' (बोरीसा इल्ला) तमीळनाडूच्या 'वामा' (कुरक्कू) हया कादंबऱ्या प्रकाशित आहेत.

कादंबरी हे समाज जागृतीचेएक प्रभावी साधन मानण्यात येते. एकविसाव्या ातकातील स्त्री संस्कृतीमधील कादंबऱ्या मधील काही लेखिकाच्या कादंऱ्या उल्लेखनिय वाढतात.

'नयना आचार्य' ('होते म्हणू स्वप्न एक',2003) या कादंबरीत दोन मैत्रिणी मधले सहजीवन, एकीचे दुसरीवर वर्चस्व गाजवणे, एका तरूण शिक्षकाची भााळेत घेणारी नेमणूक, दोघीचे त्याच्या प्रेमात पडणे, दोघी पैकी एकीशी त्याचा विवाह ठरणे, त्यापूर्वीच तिला कर्करोग आहे असे लक्षात येण, जरीही होणारा विवाह, त्यानतर तिला दिवस जाणे व तिचा कर्करोग पूर्णपणे बरा झाला आहे. असे लक्षात येणे, हे हया कादंबरीचे ढोबळ कथानक आहे. यातला अवास्तव आद ावाद सामान्य वाचकाच्या मनात आयुष्याविषयी भ्रम निर्माण करू भाकेल असा आहे.

'शोभा राऊत' यांची (अश्विनी'2009) अश्विनी हया कादंबरी मध्ये श्रीमंत घरात वाढलेली, लाडावलेली, हट्टी अश्विनी आणि तिच्या गाडीच्या ड्रायव्हरचा मुलगा यांची प्रेमकथा आहे. अश्विनीवर जबरदस्ती करणारी तिच्या कॉलेजमधील मुले, त्यातून तिला सोडवणारी नायक, या घडलेल्या प्रसंगाने अंतर्बाहय बदलुन जाणारी अश्विनी, त्या मुलाचा दुसऱ्याच कोणाशीतरी विवाह होणे व मग ते नाटक होते असे सागणे, इतकेच नव्हे, तर ते सागल्यांनी ताबडतोब मान्यही करणे, असे या कांदबरचे कथानक आहेत. साऱ्याच घटना अतर्क्य कथानकावर बेतलेल्या आहेत. त्यामुळे एका स्त्रीच्या जीवनात घडणाऱ्या विविध घटना, प्रसग एक सवंग वाटते.

'वैजयंती काळे' ('आपल घर' 2010) वैयजंती काहे यानी एका गरिबीच्या परिस्थितीमुळे भाहरात येऊन गावाकडे राहणारा एक तरून आणि याच करणामुळे बहिणीकडे येऊन भावाकडे राहणारा एक तरून हे एकच कार्यालयात नौकरीला लागतात व प्रेमात पडतात. पण तातडीने घर मिळविले तरच लग्न करणे भाक्य आहे, याची दोघांना

जाणीव आहे. त्याला वहिनीमुळे आणि तिला बहिणीमुळे त्यांच्या घरात राहणे कठिण झालेले असते. आपल्याकडी असलेल्या पैशात घर मिळचायचा प्रयत्न करताना येणारे वेगवेगळे अनुभव म्हणजे ' आपल घट' ही कादंबरी होय.

'वैजयंती काळे' ('आपल घर' 2010) मध्ये अत्यंत श्रीमंत बापाच्या मुलीला अचानक हे लक्षात येते की, आपल्या बापाने सगळा पैसा गैरमार्गाने मिळविलेला आहे. याचा तिला फार मोठा धक्का बसतो. पण तिला लक्षात येते की, आपल्या आईला आणि बहिणीला यात काहीच गैर वाढत नाही. तीला बसलेल्या मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी तिला तिच्या आत्याकडे पाठवले जाते. तिथे एक वेगळेच जग तिला पाहायला मिळते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितील वाटेल ते व्यक्ति, या गरिबांसाठी तिची आला आयुष्यभर धडपडत असते. पूर्ण विचार करून ही मुलगी याच कामात आपले आयुष्य घालवयाचे ठरविले. ज्या राजाराम नावाच्या तरूणाकडून तिला तिच्या वडिलाचे भयानक सत्य अचानक समजले असते. त्याचीच तिला या कामात साथ मिळते. पण ही कादंबरी त्यांची प्रेमकहाणी मात्र नाही. हा या कादंबरीचा महत्वाचा विशेष म्हणावा लागेल.

वैजयंती काळे याच्या हया दोन्ही कादंबऱ्यांमध्ये शेवटचे टोक आधीच माहीत आहे आणि त्यातून कुठल्यातरी अपेक्षित किंवा अनपेक्षित टोकाकडे आपण जात राहतो, अशी रूढ रचना आहे. त्यामुळे 'आपल घर' मध्ये वेगळे काहीच जाणवत नाही. घर भोधताना येणारे अनुभव हे थोडाफार फरकाने प्रत्येक घर शोधणाऱ्याला येत असतात. 'अनोखी' मधला श्रीमंती जीवन आणि गावांमधली परिस्थिती यातला विरोधही वरवरचा म्हणजेच पृष्ठभागावरील आहे. या कांदबऱ्यांमध्ये कथानक पुढे सरकत नाही, असे वाटत राहते. त्यामुळे या कांदबऱ्या वाचकाला गुंतवून ठेवू भाकत नाहीत.

एकविसाव्या भातकातील स्त्रीवादी मराठी साहित्यात स्त्रीयांच्या वाटयाला जे आले त्या जे जे जगल्या, भोगल्या त्यांचे सर्वच कथन आपल्या साहित्यातुन माडप्यांचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री जन्माला आलेल्या या समाजातील एक घटक म्हणून त्याचा विचार करणे महत्वपूर्ण ठरतो. तसेच त्याच्या भावना, मान, आत्मसन्मानही तेवढाच महत्वाचा आहे. प्रस्तुत भोधनिबंधात फक्त स्त्री साहित्याचाच विचार करण्यात आलेला आहे. प्रस्तुत विषयाच्या मांडणीच्या दृष्टीने मला मिळालेले स्त्री साहित्य प्रगट करण्याचा प्रयत्न केला आहे.

एकविसाव्या भातकातील साहित्यात स्त्रियाचे भुमीका त्याच्या 'अनुभव कथा' अतिशय महत्वाचा वाढतात. कथा, कविता, आत्मचरित्र, नाटक, कादंबऱ्या इ. सातित्यातून आपले विचार व्यापक मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. स्त्रीवादी साहित्य प्रवाहाने मराठी साहित्यात मोलाचा वाटा निर्माण केला आहेत. मा. फुले याच्या विचार स्त्रीवादी साहित्यासाठी मोलाचे वाटतात. ''स्त्री वर प्रकाशित नसून स्वयंसिध्दा आहे.''

**सदंर्भ :–**

1. *छलित साहित्य प्रियंका, 2011, नागपूर*
2. *अस्मिताद  f 2014*
3. *'मराठी दलित कांदबरीची अभिनव वाटचाल' डॉ. सु  ीला ढगे.*
4. *स्वावंत्र्योत्तर मराठी कविता*
5. *स्त्री साहित्याचा मागोवा : खंड – 3*
6. *स्त्री साहित्याचा मागोवा : खंड –4*